**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 844/2007.**

श्री प्रा. राम माधवराव हळदे
ह. मु. नेर (शिवाजी नगर)
ता. नेर जि. यवतमाळ 445 102 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद यवतमाळ ता. जि. यवतमाळ

2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्य लेखा तथा अर्थ अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ ता. जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.8.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.3.2006 रोजी जिल्हा परिषद भविष्य निर्वाह निधी खाते क्र. एच 10181 अन्वये 2004–2005 व 2005–2006 पर्यंतचा संपूर्ण हिशोब आजपर्यंत न दिल्या प्रकरणी त्वरीत 7 दिवसाचे आत मिळणेबाबत माहिती मागितली व माहिती

व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 20.3. 2006 रोजी ''वित्तीय वर्ष 2005–2006 संपायचे असल्यामुळे 2004–2005 चे हिशोब पत्रिका देण्यात येत आहे. तरी त्याची माहितीच्या अधिकारा करीता भरावी लागणारी रक्कम 3/– (अक्षरी रुपये तीन फक्त) खाली दर्शविलेल्या लेखा शिर्षामध्ये चलान द्वारा भरणा करुन त्या चलनाची प्रत या कार्यालयास सादर करावी म्हणजे आपण मागणी केल्याप्रमाणे पूढील कार्यवाही करण्यात येईल'' असे कळविण्यात आलेले दिसून येते व सदरच्या पत्राची प्रतिलिपी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद (माध्यमिक) उच्च माध्यमिक विद्यालय, माणिकवाडा यांना माहिती करीता अग्रेषित. सदर पत्र संबंधितावर बजावून त्याची पोच घेण्यात यावी असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या पत्राप्रमाणे दि. 29.3. 2006 रोजी अपीलकर्ता यांनी रु. 3/– चा भरणा केलेला दिसून येतो. व त्याच दिवशी त्यांना सन 2004–2005 भविष्य निर्वाह निधी हिशोब पत्रिका उपलब्ध करुन दिलेले दिसत आहे व त्याची पोच त्यांनी दिलेली आहे. असे असले तरी दि. 3.4.2006 रोजी पुन्हा एक नवीन अर्ज करुन अपीलकर्ता यांनी 1) पाचवे वे वेतन आयोगाची थकबाकी रक्कम भविष्य निर्वाह निधी खाते क्र. एच 10181 कधी व किती रक्कम जमा करण्यात आली 2) सन 2005–2006 मध्ये माझ्या पगारातून मासिक वर्गणी (झेड. पी. एफ.) फेब्रुवारी पेड इन 2006 पर्यंत कपात करुन भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा कां केली नाही माहिती देण्याबाबत. व माहिती व्यक्तिशः घेणार व तीन दिवसाचे आंत माहिती देण्याबाबत नविनच अर्ज केलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि. 10.4.2006 रोजी मागितलेल्या माहितीकरीता रु. 6/– चालानद्वारे खालील लेखाशिर्षकात जमा करावेत व चालान हया कार्यालयास सादर करावी म्हणजे हया संदर्भातील पुढील कार्यवाही करता येईल असे कळविलेले दिसते. त्याप्रमाणे दि. 18.4.2006 रोजी अपीलकर्ता यांनी रु. 6/– चा भरणा केलेला दिसून येतो. व त्यांना 2003–2004, 2004–2005 या वर्षातील माहिती उपलब्ध करुन दिलेली असून तशी पोच त्यांनी दिलेली आहे. पुन्हा दिनांक

7.7.2006 रोजी अपीलकर्ता यांचे दि. 23.6.2006 च्या पत्राप्रमाणे भविष्य निर्वाह निधी खाते क्र. एच 10180 मध्ये जमा झालेल्या पाचवे वेतन आयोग थकबाकी रकमेवरील व्याजासह सन 2005–2006 चे भविष्य निर्वाह निधी हिशेबपत्रक यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर हिशेबपत्रक प्राप्त झाल्याची पोच या कार्यालयास पाठवावी असे कळविलेले दिसून येते. असे असले तरी दि. 19.4.2006 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 17.8.2006 रोजी पाच संदर्भ देवून संदर्भ क्र. 5 नुसार आपण माहितीच्या अधिकारात माहिती न मिळाल्याबाबत स्मरण पत्र दिले आहे. तथापि या कार्यालयाकडून संदर्भ क्र. 1 नुसार आपण मागितलेली माहिती दि. 29.3.2006 नुसार देण्यात आलेली आहे. संदर्भ क्र. 2 ची नुसार मागीतलेली माहिती दि.18.4.2006 रोजी देण्यात आलेली आहे. व त्याबाबतची पोच कार्यालयीन नस्तीमध्ये उपलब्ध आहे. संदर्भ क्र. 3 व 4 अन्वये केलेल्या अपीलानुसार या कार्यालयाचे पत्र क्र. 1668 दिनांक 7.7.2006 ला आपणास माहिती पाठविण्यात आलेली आहे. उपरोक्त माहिती आपणास मिळालेली आहे किंवा नाही याबाबत या कार्यालयास तात्काळ कळवावे. पुन्हा दिनांक 13.9.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संदर्भ दि. 21.8.2006 चे अपीलाचे अनुषंगाने कळविलेले दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांनी दि. 18.3.2006 व 3.4.2006 च्या अर्जाच्या नुसार जी माहिती मागितलेली दिसून येते ती माहिती त्यांनी अनुक्रमे सात दिवसाचे आंत व तीन दिवसाचे आंत उपलब्ध करुन द्यावी असे नमुद केलेले दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 7 (1) प्रमाणे अधिनियमाच्या कलम 6 प्रमाणे अर्ज केल्यानंतर 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद आहे. व त्यामुळे अर्जदाराच्या स्वतःच्या कल्पनेप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे बंधन हे जन माहिती अधिकारी यांचेवर नाही किंवा अर्जदारानेसुध्दा अर्जामध्ये किती दिवसात माहिती उपलब्ध करुन

द्यावी असे नमुद करण्याची आवश्यकता नाही. वास्तविक अपीलकर्ता यांनी दोनही अर्जातील मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याबद्यलची खर्चाची प्रक्रिया व माहिती उपलब्ध झाल्याची पोच अपीलकर्ता अर्जदार यांनी दिलेली सुध्दा आहे. माहिती मागण्याचा अर्ज हा दि. 18.3.2006 व 3.4. 2006 या तारखांचा असल्यामुळे सन 2005–2006 चे भविष्य निर्वाह निधीच्या संदर्भातील हिशोब मागणे हे मुळातच अपरिपक्व आहे. व त्यामुळे सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना हिशोब पूर्ण झाल्यावर कळविण्यात येईल व तशी ती कळविलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना प्रथम अपील करण्याचे काहीही कारण नव्हते. तसेच प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा त्यांना वस्तुस्थितीप्रमाणे निर्णय दिलेला असल्यामुळे व त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हे निदर्शनास आणून दिलेले असल्यामुळे द्वितीय अपील सुध्दा दाखल करण्याचे काहीही कारण नव्हते. वरील नमूद केलेली घटनाक्रम लक्षात घेता अपीलकर्ता यांनी प्रथम अपील किंवा द्वितीय अपील दाखल करुन अधिनियमाच्या तरतुदींचा गैरवापर केलेला दिसून येतो. ''माहितीचा अधिकार'' याचा उद्येश प्रामुख्याने माहिती उपलब्ध करुन घेणे असा आहे. यातही जी माहिती त्यांनी मागितली आहे ती वैयक्तिक स्वरुपाची आहे. त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या हिशोबाच्या संदर्भामध्ये त्यांना स्वतः कार्यालयात जावून त्याबाबतची माहिती ही अद्ययावत करुन घेता आली असती. त्याकरीता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचा वापर करण्याची काहीही आवश्यकता नव्हती. माहिती मिळण्याचा अर्ज करण्यापूर्वी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असेही त्यांचे म्हणणे दिसून येत नाही व त्यामुळे स्वतःच्या कल्पनेप्रमाणे सात दिवसाचे आत किंवा तीन दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी ही बाब सुध्दा अपरिपक्वतेचे लक्षण आहे. अधिकार मिळालेला व त्याबाबत कारण विचारता येत नाही म्हणून कोणत्याही प्रकारची माहिती ज्यात कोणत्याही प्रकारचे जनहित नाही असे मागणे गैर आहे. कोणताही अधिकार हा मर्यादित व आवश्यक असल्यावरच वापरल्यास

प्रभावी ठरतो. या प्रकरणात मुळातच अर्ज माहितीच्या अधिकारात अर्ज करावयाची आवश्यकता नव्हती. माहिती मागतांना ती अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे असावयास पाहिजे तसेच सर्वसामान्य ज्ञानाच्या दृष्टीने सुध्दा ती माहिती मागितलेली असली पाहिजे. माहिती उपलब्ध झाल्यावर सुध्दा वर नमुद केल्याप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी किंवा आयोगाच्या वेळेचा अपव्यय करणे हेही गैर आहे. तसेच अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे माहितीचा अर्ज त्यानंतर त्या अर्जाप्रमाणे 30 दिवसात माहिती उपलब्ध झाली नाही तर प्रथम अपील व त्यातही माहिती उपलब्ध झाली नाही तर द्वितीय अपील अशी तरतुद असल्यामुळे माहितीच्या अनेक अर्जांच्या निर्णयाविरुध्द एक प्रथम अपील किंवा एक द्वितीय अपील दाखल करणेसुध्दा अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे नाही व वरील सर्व कारणांच्या मुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 9.1.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.